महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

# कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र ललित कला शिक्षण सेवा, गट-अ

**क्रमांक : २०४४/१२-अ/२३२१/सात** **जाहिरात क्रमांक: ००२/२०२१**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र ललित कला शिक्षण सेवा, गट-अ या पदावरील भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. एकूण पदसंख्या:-१**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण मागासवर्गीय | अराखीव | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| महिला (३०%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

**३. पात्रतेचे निकष:-**

**३.१ भारतीय नागरिकत्व**

**३.२ वयोमर्यादा:-**

३.२.१ किमान व कमाल वयोमर्यादा:-

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण / महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक | | दिव्यांग उमेदवार | |
| | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ |
| १ सप्टेंबर, २०२१ | १८ | ५० | ५५ | ५० | ५५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ५० | ५५ |

३.२.२ मागासवर्गीय आणि खेळाडू व्यक्तींसाठी वयोमर्यादेतील शिथिलतेसंदर्भातील अनुज्ञेय सवलतींपैकी अधिकतम एकच सवलत देय राहील.

३.२.३ महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पात्र कर्मचाऱ्यांना कमाल वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

**३.३ शैक्षणिक अर्हता:-**

३.३.१ भारतातील किंवा परदेशातील विद्यापीठाची ललित कलेची किंवा दृक कलेच्या कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी प्रथम श्रेणीत (किंवा जेथे दर्जा देण्यात येतो, त्याबाबतील समतुल्य दर्जा असलेले) उत्तीर्ण

३.३.२ शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कमांक : एडीआर-२०१४/प्र.क्र.१३६/तांशि-६, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२० अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार दृक कला (Visual Art) यामध्ये रेखा व रंग कला, उपयोजित कला, शिल्प कला, मातकाम, धातुकाम, अंतर्गत गृह सजावट, वस्त्र कला या विषयातील पदव्युत्तर पदव्यांचा समावेश होतो.

**आणि**

**३.४ अनुभव:-**

३.४.१ शासन मान्य कला संस्थेतील अद्यापनाचा किंवा शासन मान्य कला संस्थेतील प्रशासकीय कामाचा १७ वर्षापेक्षा कमी नाही इतक्या वर्षाचा एकत्रित किंवा अपवर्जक अनुभव.

३.४.२ शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : एडीआर-२०१४/प्र.क्र. १३६/तांशि-६, दिनांक १ ऑगस्ट, २०१९ अन्वये शासनाकडून घेण्यात आलेल्या निर्णयानुसार उपरोक्त अनुभव विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर किंवा शैक्षणिक अर्हता धारण करण्याच्या कालावधीत केलेला असला तरी तो ग्राह्य धरण्यात येईल.

**३.५ प्राधान्यशील अर्हता :- खालीलप्रमाणे विशेष शैक्षणिक अर्हता किंवा गुणवत्ता संपादन केलेल्या उमेदवारास प्राधान्य :**

(१) शासनाच्या कामकाजाविषयी परिपूर्ण ज्ञान असणे आवश्यक.

(२) आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यकुशलता ग्रहण केलेली असावी, म्हणजे —

(अ) आंतरराष्ट्रीय कला संस्थांमधून केलेल्या कामाचा अनुभव किंवा देशाबाहेरील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्यशाळा, चर्चा सत्रे सभा आयोजनाचा अनुभव.

(ब) उच्च शैक्षणिक क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्यशाळा, चर्चा सत्रे, सभा आयोजनाचा अनुभव.

(क) जागतिक स्तरावरील कलेचा विकास करण्यासाठी नियोजन व अंमलबजावणी यशस्वीरित्या केलेली असावी.

(३) गुणवत्ता प्रमाणक, मुल्यमापन, दर्जाची वर्गवारी पध्दत यांचा अनुभव.

(४) प्रमाणकांचे संशोधन, व्याप्ती, ग्रहण करणे आणि त्यांची प्रत्यक्षरित्या अंमलबजावणीची क्षमता.

(५) ललित कला क्षेत्रातील आव्हाने आणि विकासाची गरज लक्षात घेता निर्णय घेण्याची क्षमता.

